## नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१३ मधील
## निशाणी ८२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ आणि प्रतिवादी क्र.१अ यांनी दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून ग्रामपंचायत अंदुरा यांना प्रतिवादी म्हणुन सामील करुन घेण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) प्रमाणे केलेला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा ताबा, निरंतर मनाई व आदेशात्मक मनाई मिळणेकामी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ ते ३ हजर झाले परंतु दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ व ३ मयत झालेले आहे. प्रतिवादी क्र.२ सद्या संपुर्ण प्रकरण पाहत आहे. दाव्याची पाहणी केली असता ग्रामपंचायत प्लॉट क्र.४३८ बद्दल वाद आहे असे दिसून येते. वादीने दाव्यात असे कथन केले आहे की, सदर प्लॉट वादीने ग्रामपंचायत नया अंदुरा यांचेकडून खरेदी केलेली आहे. याउलट प्रतिवादीचे म्हणणे आहे की, सदर प्लॉट ग्रामपंचायतच्या मालकीचा असून प्रतिवादीने सदर प्लॉटवर अतिक्रमण केलेले आहे. प्रतिवादीचे असेही म्हणणे आहे की, सन १९९० पुर्वीपासून सदर प्लॉटचा ताबा अतिक्रमण धारक म्हणून प्रतिवादी यांचेकडे आहे. त्याअनुषंगाने ग्रामपंचायत नया अंदुरा यांनी प्रतिवादींना नोटिस देवून दंड देखील वसुल केलेला आहे. प्रस्तुत दावा वादी व ग्रामपंचायत, नया अंदुरा यांनी संगनमत करुन प्रतिवादीचे हक्क डावलण्याच्या उद्देशाने दाखल केलेला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत नया अंदुरा ही दाव्यात आवश्यक आणि महत्वपुर्ण पक्षकार असून प्रतिवादी क्र.४ म्हणून समाविष्ट करण्यात यावे. ग्रामपंचायत नया अंदुरा यास प्रतिवादी म्हणून समाविष्ट केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट खरी परिस्थिती न्यायालयासमोर येईल ज्यामुळे न्यायालयाला प्रकरण निकाली करणेकामी मदत होणार आहे. ग्रामपंचायत अंदुरा यास पक्षकार म्हणून समाविष्ट न केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल, म्हणून प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा.

**३.** वादीने सदर अर्जावर निशाणी ८३ अन्वये जबाब दिलेला असुन अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. वादीचे कथन की, प्रतिवादी यांनी केलेला अर्ज कायद्याने चालणारा नाही. वादीने वादातीत प्लॉट सरकारकडून खरेदी केलेला आहे. सदर कथनापृष्ठ्यर्थ वादीने दस्ताऐवज अभिलेखावर दाखल केलेले आहे. वादीची ग्रामपंचायत नया अंदुरा यांचेविरुध्द कोणतीही मागणी नाही. दावा अत्यंत जुना आहे. प्रकरण प्रलंबित ठेण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला असून खर्चासह फेटाळण्यास पात्र आहे.

**४.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा प्लॉटचा ताबा मिळणसाठी तसेच निरंतर व आदेशात्मक मनाई मिळणेकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी हजर होवून जबाब दाखल केला व दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा मृत्यु झाला याबाबी अविवादीत आहे. प्रतिवादीने जबाबात असे कथन केले आहे की, सन १९९० मध्ये प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत वादातीत प्लॉटवर घर बांधणेकामी प्रतिवादी यांना मंजुरी मिळालेली आहे. सन १९९२ पासून वादातीत प्लॉटवर अतिक्रमण धारक म्हणून प्रतिवादी यांचा ताबा आहे. याउलट वादीचे कथन आहे की, वादीने सदर मिळकत सरकारकडून लिलावात खरेदी केलेली आहे.

**५.** दोन्ही पक्षांचे परस्पर विरोधी कथन पाहता प्रस्तुत अर्जासंदर्भातील तरतुदीच्या उहापोह करणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) अन्वये *दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पुर्णपणे अभिनिर्णय करुन ते निकाली काढणे न्यायालयाला शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तीची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव दाखल करण्यात यावे असा न्यायालयास आदेश देता येईल.* वादीतर्फे श्री. एस.टी. इंगळे यांनी

मोहम्मद हुसेन गुलाम अली शरीफी विरुध्द म्युनिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर बॉम्बे आणि इतर (२०२०) १४ एस.सी.सी. पान नं.३९२ या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवूर असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात ग्रामपंचायत नया अंदुरा हे योग्य किंवा आवश्यक पक्षकार नाही. मी सदर न्यायानिर्णयाचे वाचन केले. सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले आहे की, *''It is a settled principle of law, which does not need any authority to support the principle, that the plaintiff being a dominus litis cannot be forced to add any person as party to his suit unless it is held keeping in view the pleadings and the relief claimed therein that a person sought to be added as party is a necessary party and without his presence neither the suit can proceed and nor the relief can be granted. It is only then such person can be allowed to become party, else the suit will have to be dismissed for non-impleadment of such necessary party.''*

**६.** वरील न्यायनिर्णयातील तथ्य आणि प्रस्तुत दाव्यातील तथ्य भिन्न असले तरी न्यायनिर्णयात प्रतिपादन केलेले न्यायतत्व हे कायद्याचे प्रचलित विधान आहे. सदर विधाना अनुसरुन प्रस्तुत दाव्यात ग्रामपंचायत नया अंदुरा योग्य व आवश्यक पक्षकार आहे किंवा नाही ते पहावे लागेल. उपरोक्त कथन केल्याप्रमाणे वादातीत प्लॉट ग्रामपंचायत नया अंदुराकडून खरेदी केल्याची बाब अविवादीत आहे. प्रतिवादीच्या म्हणणे अनुसार वादीला वादातीत मिळकतीचा ताबा कधीही मिळालेला नव्हता. याउलट वादीचे म्हणणे की, प्रतिवादी परवान्यावर वादातीत प्लॉटमध्ये राहत होती. सदर परवाना वादीने दिनांक २३.०३.२०१३ रोजी रद्द केलेला आहे. एकंदरीत वादीच्या दाव्यातील वादकथनाचे अवलोकन केल्यास वादीचा दावा प्रतिवादींविरुध्द आहे. ग्रामपंचायत नया अंदुरा विरुध्द वादीची कोणतीही मागणी नाही. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी वादी व प्रतिवादी यांनी

दाखल केलेल्या कागदपत्रांचा उहापोह अंतरीम मनाईहुकूमाचा आदेश पारीत करतांना केलेला आहे. त्यामुळे त्यास दस्ताऐवजासंबंधी निष्कर्ष नोंदविणे न्यायोचित होणार नाही. अशा परिस्थितीत ग्रामपंचायत नया अंदुरा ही योग्य किंवा आवश्यक पक्षकार नाही की ज्यामुळे वादीचा दावा खारीज होईल. म्हणून प्रतिवादीचे अर्ज खारीज करणेस पात्र असून मी त्यासंदर्भात खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

दिनांक : १२/०१/२०२४ **(श्रीमती डी. एम. पाटील)**
ठिकाण : बाळापूर दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Rasheed |
| Date of Decision | :- | 12/01/2024 |
| Order signed by P.O on | :- | 12/01/2024 |
| Order uploaded on | :- | 12/01/2024 |